# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

## वृक्ष प्राधिकरण

मा. वृक्ष प्राधिकरण समितीवर नामनिर्देशित सदस्यांची नेमणूक करण्यासाठी खालील पात्रता धारकांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

१. कृषी/वन/उदयान विदया/विषयाची पदवी किंवा डिप्लोमा तसेच शास्त्र शाखेची पदवी किंवा पदविका असणे आवश्यक असेल.
२. वृक्षांची लागवड/संवर्धन/स्थलांतरण आधिक्षक/वा पर्यावरण सुरक्षा विषयाचा किमान पाच वर्षाचा अनुभव असलेल्या पात्र व्यक्तिंना प्राधान्य
३. वृक्ष प्राधिकरणावर बिनसरकारी संघटनांचे प्रतिनिधी म्हणून नियुक्त होण्यास नामनिर्देशित व्यक्ती शासनाच्या सामाजिक वनीकरण विभागाकडील नोंदणीकृत बिनसरकारी संघटनेचा सक्रिय सदस्य असणे आवश्यक आहे.
४. वृक्षांचे रोपण, जतन व पुनर्रोपण किंवा पर्यावरण संवर्धन क्षेत्रातील विशेष ज्ञान व पाच ते दहा वर्षे अगर अधिक प्रत्यक्ष अनुभव
५. राष्ट्रीय पातळीवर कार्यरत बिनसरकारी संघटनांना (प्राधान्य)
६. नामनिर्देशित सदस्य स्वतंत्र बिनसरकारी संघटनेचा प्रतिनिधी असावा.

तरी उपरोक्त वरील अर्हता असणा—या उमेदवारांनी विहीत नमुन्यात संपूर्ण माहितीसह भरलेले अर्ज (साक्षांकित प्रतीसह) **Tree Application Link on** <u>www.umc.gov.in</u> अथवा <u>www.tree.umcgov.in</u> या लिंकवर जावुन **Scan** करुन खालील कागदपत्र दिनांक २५/९/२०२० पासुन दिनांक ०५/१०/२०२० रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत, साक्षांकित प्रतीसह अपलोड करावे. कोरोनामुळे कोणत्याही प्रकारे **offline** अर्ज स्विकारले जाणार नाहीत. मुदतीनंतर येणा—या अर्जाचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

महापालिका आयुक्त
सभापती, वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका

<u>सोबत पुढीलप्रमाणे कागदपत्र अनिवार्य :—</u>

१. कृषी/वन/उदयान विदया/विषयाची पदवी किंवा डिप्लोमा तसेच शास्त्र शाखेची पदवी किंवा पदविका असणे आवश्यक असून तसे प्रमाणपत्राची स्वसाक्षांकीत प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक असेल.
२. वृक्षांची लागवड/संवर्धन/स्थलांतरण आधिक्षक वा पर्यावरण सुरक्षा विषयाचा किमान पाच वर्षाचा अनुभव असलेल्या पात्र व्यक्तिंना प्राधान्य तसे अनुभव प्रमाणपत्राची स्वसाक्षांकीत प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक असेल.
३. वृक्ष प्राधिकरणावर बिनसरकारी संघटनांचे प्रतिनिधी म्हणून नियुक्त होण्यास नामनिर्देशित व्यक्ती शासनाच्या सामाजिक वनीकरण विभागाकडील नोंदणीकृत बिनसरकारी संघटनेचा सक्रिय सदस्य असणे आवश्यक असून त्याबाबत प्रमाणपत्राची स्वसाक्षांकीत प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक असेल.
४. वृक्षांचे रोपण, जतन व पुनर्रोपण किंवा पर्यावरण संवर्धन क्षेत्रातील विशेष ज्ञान व पाच ते दहा वर्षे अगर अधिक प्रत्यक्ष अनुभव असल्याचे प्रमाणपत्राची स्वसाक्षांकीत प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक असेल.
५. राष्ट्रीय पातळीवर कार्यरत बिनसरकारी संघटनेच्या नोंदणीचे प्रमाणपत्राची स्वसाक्षांकीत प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक असेल.
६. नामनिर्देशित सदस्य स्वतंत्र बिनसरकारी संघटनेचा प्रतिनिधी असावा व त्यास वृक्ष लागवड आणि वृक्ष संवर्धन क्षेत्रातील किमान पाच वर्षापेक्षा अधिक अनुभव असणे आवश्यक असून तसे प्रमाणपत्राची स्वसाक्षांकीत प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक असेल.

७ तसेच अर्जदार हा ठाणे जिल्हयाचा रहिवासी असावा. त्याचा रहिवाशी पुरावा साक्षांकित प्रतीसह (आधार / वोटर आयडी / सक्षम प्राधिकारी, दिलेला रहिवाशी दाखला / पासपोर्ट इत्यादी) जोडणे आवश्यक असेल.

<u>स्वंयघोषणा:—</u>

मला मान्य आहे की, अर्जाची छाननी केल्यानंतर पात्र अर्जदारांना मूळ कागदपत्रांच्या पडताळणीसाठी बोलाविण्यात येईल. सदर प्रकरणी निवड करणेबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार वृक्ष प्राधिकरणास आहे. कोणतेही कारण न देता कोणत्याही कारणास्तव यात बदल / रदद /स्थगिती देण्याचा अधिकार मा. वृक्ष प्राधिकरण यांना असेल. वरील पद लाभकारक/पगारी/कायम नसून ही सेवा स्वेच्छा सेवा आहे. सर्व कागदपत्रे माझ्याद्वारे स्वाक्षरीकृत असून स्पष्ट आहेत आणि जर कोणताही कागदपत्र स्पष्ट न आढळल्यास ते नाकारले जावु शकतात. आणि वरील सर्व माहिती माझ्या माहिती व समजुतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळुन आल्यास याबाबत कारवाई होईल, याची मला जाणीव आहे.

महापालिका आयुक्त
सभापती, वृक्ष प्राधिकरण
उल्हासनगर महानगरपालिका

Scanned with CamScanner